# टेलिमेडिसिन तंत्राद्वारे हृदयाच्या इसीजीची कोल्हापुरात सुविधा

कोल्हापूर, ता. १ : टेलिमेडिसिन तंत्राद्वारे हृदयाचा आलेख (इसीजी) केवळ एका छोट्या उपकरणाद्वारे काढणे आता कोल्हापुरात शक्य झाले आहे.

या उपकरणाद्वारे इसीजी घेतल्यानंतर त्याला ठराविक क्रमांकावर मोबाईल जोडल्यास मुंबईत हेल्थकेअर टेलिबायोमेडिकल केंद्रावर संपर्क होतो व तेथून काही मिनिटांत मोबाईलवर इसीजी रिपोर्ट कळवला जातो किंवा फॅक्स किंवा इंटरनेट सुविधा असल्यास त्यावर रिपोर्ट तत्काळ पाठवला जातो. हेल्थ केअर टेलिबायोमेडिकलचे संचालक हरेश मेहता यांनी आज 'सकाळ'शी बोलताना ही माहिती दिली.

ते म्हणाले, "वाढता ताणतणाव, आहारातील बदल किंवा बदलती जीवनशैली यामुळे हृदयविकार असलेल्या रुग्णांत वाढ होत आहे. या विकारात तत्काळ इसीजी व त्या आधारे उपचाराची गरज असते. पहिल्या तासात योग्य उपचार झाले तर हृदयविकाराचा मोठा धोका टळू शकतो.

मोठ्या शहरांत तत्काळ उपाययोजना शक्य आहे; पण ग्रामीण भाग किंवा छोट्या छोट्या शहरांत हृदयविकाराचे प्राथमिक निदान करणारी यंत्रणा नाही. त्यामुळे नेमके काय करायचे या गोंधळात उपचाराची वेळ निघून जाते; पण टेलिमेडिकल तंत्राद्वारे ग्रामीण भागातील डॉक्टरही हे उपकरण वापरू शकतील. जेणेकरून रुग्णाच्या हृदयविकाराचा अंदाज येईल व तत्काळ पुढच्या उपचारासाठी रुग्णाला योग्य त्या ठिकाणी तासाभरात पोहोचता येईल."

ते म्हणाले, "हे उपकरण एखाद्या मोबाईल फोनएवढे आहे. ते सहज हाताळता येते. टेलिबायोमेडिकलची मुंबईतील यंत्रणा अतिशय अद्ययावत आहे. २४ तास ही यंत्रणा सुरू असते. सहा एम. डी. कार्डिओलॉजिस्ट तेथे हजर असतात. ते तत्काळ फोनवरून इसीजीचा रिपोर्ट कळवतात. आवश्यक त्या सूचनाही देतात. या उपकरणाची किंमत कमी आहे. त्यामुळे सर्व दवाखान्यांत (जनरल प्रॅक्टिशनर्स) ते बसवणे शक्य आहे. सध्याच्या इसीजी यंत्रांची गुंतवणूक मोठी आहे. त्यामुळे इसीजी काढण्याचा खर्चही रुग्णांना न परवडणारा आहे. हे उपकरण दवाखान्यात असेल तर रुग्णांना कमी खर्चात इसीजी काढता येईल."